# ग्राहकांचं हित जपताना दिला जातो 'बळीराजा'चा बळी!



नित्यनियमाप्रमाणे देवदर्शन आटोपून गणपत पारावर येऊन बसला होता. संपतही देवदर्शन घेऊन गणपतजवळ येऊन बसला व म्हणाला, ''काय गंपा, आज निवांत दिसतोस, काही कामधंदा दिसत नाही आज.''

यावर हसत गणपत म्हणाला, ''हो ना रं संपा, काहीच कामधंदा नाही. देतो का काही काम असलं तर तुझ्याकडे?''

हसतच संपत म्हणाला, ''नको बाबा. तू नाही परवडणार मला. एक तर मजुरांमुळे शेती परवडत नाही आणि त्यात तुझी भर पडली तर मग विचारायलाच नको.''

गणपतही हसतच म्हणाला, ''मला काही जास्त नको पगार. दोन टाईम खायला- प्यायला मिळालं तरी बास झालं. कारण आजकाल घरची शेती करूनही खाण्या-पिण्याचे वांधे झालेत बघ. आपल्यापेक्षा मजूर सुखी आहे. एक तर रेशनवर स्वस्त किंवा फुकट धान्य, वर प्रत्येक हंगामात मजुरीचे दर वाढतातच. आठवड्यातील दोन-चार दिवस काम केले तर त्यांचे दिवस सहज निघून जातात. आपण मात्र रात्रंदिवस काबाडकष्ट करूनही हातात काय तर गाजराची पुंगी! संपा, हे सरकार आल्यापासून म्हणतंय- शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार! त्यांनी तर हे सुद्धा सांगितलं होतं की २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होईल. मला तर उलटंच दिसायला लागलंय. उत्पन्न दुप्पट होण्याऐवजी खर्च मात्र दुप्पट झाला. अगदी देशाच्या कृषिमंत्र्यांनी भाषणात सांगितलं की काही शेतकऱ्यांचं उत्पन्न ५-१० पट वाढलंय म्हणून. आजच्या बातम्याही मी ऐकल्या होत्या. संपा, काय भानगड आहे रे ही? हे मंत्री आपल्या देशातील शेतकऱ्यांबद्दल बोलतात की दुसऱ्या देशातील शेतकऱ्यांबद्दल हेच मला समजत नाही.''

यावर हसून संपत म्हणाला, ''भानगड बिनगड काही नाही. हे काय आपल्याला नवीन आहे काय? इंग्रजांनी आपली सोने-चांदी लुटून नेली असे म्हणतात. पण खरं सांगतो गंपा, हे सोने-चांदी म्हणजे आपल्या शेतातील उत्पादन. 'मेरे देश की धरती उगले हिरे-मोती, मेरे देश की धरती' हे जुनं गाणं आठव की! आपल्या शेतातून उगवलेलं हे धन इंग्रज त्यांच्या देशात घेऊन जात आणि त्यावर प्रक्रिया करून ते आपल्या देशात चढ्या दराने विकत. हा व्यापार त्यांनी दीडशे वर्षे केला. त्यानंतर आपण स्वतंत्र झालो. यावर्षी आपण स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण करत आहोत. परंतु या ७५ वर्षांत काय झालं? कोणत्याही पक्षाचे सरकार येऊ देत, शेतकऱ्यांचा फक्त वापरच करायचं त्यांना माहीत आहे. एक तर निवडणुकीच्या वेळी शेतकऱ्यांना मोठमोठी आश्वासनं द्यायची. शेतीमालाचे भाव वाढवू, उत्पन्न दुप्पट करू, वीज मोफत देऊ, कर्जमाफी देऊ, दिवसा वीज देऊ यासारखी अनेक आश्वासने देऊन त्यांच्याकडून मते घेतात आणि

नंतर मात्र सर्वांची पाटी कोरी ठेवतात. हेच मागील ७५ वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे मागील ५-६ वर्षांत काहीही वेगळे चित्र दिसते असे म्हणता येणार नाही.''

मध्येच गणपत म्हणाला, ''का रं संपा, हे सर्व आमदार, खासदार, मंत्री हे सुद्धा शेतकरी कुटुंबातील असतात ना? वर बसलेले अधिकारी सुद्धा शेतकरी कुटुंबातील किंवा खेड्यातूनच गेलेले असतील ना? मग त्यांना हे सर्व प्रश्न समजत नसतील काय?''

यावर हसून संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, या सर्व बाबी त्यांनाही समजतात. शेतकऱ्यांना शेती परवडत नाही. शेतीमालाला भाव वाढवून दिला पाहिजे. शेती टिकली तरच शेतकरी टिकेल आणि अन्नधान्य मिळेल हे सर्व खरं असलं तरी यावर एकच उत्तर- महागाई वाढली नाही पाहिजे. जीवनावश्यक वस्तूंचे भाव कमी राहिले पाहिजेत; कारण महागाई वाढली तर ग्राहक नाराज होतो. ग्राहक फार हुशार आणि चाणाक्ष असतो. त्यामुळे त्याला नाराज करून चालणार नाही. म्हणून महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि ग्राहकाला खूष ठेवण्यासाठी सर्व जीवनावश्यक वस्तूंचे दर कमी करावे लागतात. या सर्व जीवनावश्यक वस्तू शेतकरी पिकवत असल्यामुळे बळीचा बकरा बळीराजाच होतो. स्वातंत्र्य मिळाल्यापासून सरकारने एकच धोरण ठेवले आहे. उद्योग, व्यवसाय, शहरीकरण, उदारीकरण यांच्यासाठी पायघड्या आणि शेतकरी म्हटले की हाताची घडी, तोंडावर बोट! आपल्या उत्पादनाचा दर शेतकरी ठरवू शकत नाही. इतर प्रत्येक व्यवसाय- व्यापारात दरवर्षी उत्पादनाच्या किंमतीमध्ये १०-१५ टक्के वाढ होते. कारण उत्पादन खर्च वाढलेला असतो. शेती उत्पादनाच्या भावाबद्दल मात्र तसे कधीच होत नाही. शेतीमालाचा भाव दरवर्षी वाढला तर महागाई वाढेल. महागाई वाढली तर देशातील कामगारांना महागाई भत्ता जास्त द्यावा लागेल. म्हणजेच त्यांचे पगार वाढतील. त्यामुळे देशात उत्पादित होणाऱ्या सर्व उत्पादनांचे दर वाढतील. हे दर वाढल्यामुळे त्यांची जास्त विक्री होणार नाही किंवा जागतिक पातळीवर ते स्पर्धा करू शकणार नाहीत. म्हणजेच अनेक उद्योग-धंदे तोट्यात येतील. म्हणून शेती उत्पादन हे जीवनावश्यक बाबींमध्ये घेण्यात आले. या वस्तूंचे भाव वाढू द्यायचे नाहीत, वाढले तर नियंत्रणात ठेवण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करायच्या अशा प्रकारचे धोरण सुरू आहे. यात आपला बळीराजा मात्र भरडला जातो. सुरवातीच्या काळात जमीनधारणा मोठी होती, निसर्गही शेतीला साथ देत होता. शेतकऱ्यांच्या गरजाही माफकच होत्या. शेतीमधून फक्त पोट भरण्यापुरते पिकावे एवढीच माफक अपेक्षा होती. परंतु आता मात्र चित्र बदलले आहे. शेतीचे तुकडे होऊन जमीनधारणा अल्प वा अत्यल्प झाली आहे. निसर्गही शेतीवर कोपला आहे. व्यापारीही शेतकऱ्यांना लुटत आहेत. उत्पादन खर्च वाढत असताना उत्पादनाचे दर मात्र कासवाच्या गतीने वाढत आहेत, शेतकऱ्यांच्याही गरजा आता वाढू लागल्या आहेत. शेतकऱ्यांनाही हौस-मौज करावी वाटते. त्यांनाही त्यांच्या मुलांना चांगली शाळा हवी असे वाटते. परंतु यासाठी लागणारा पैसा मात्र शेतीतून कधी मिळतच नाही. उत्पादन भरमसाठ काढणारा शेतकरी पैशाच्या बाबतीत कायमच कंगाल राहिलेला आहे.''

संपतला मध्येच थांबवत गणपत म्हणाला, ''का रं संपा, यातून काही मार्ग निघेल असं वाटतं का तुला? कारण हीच परिस्थिती राहिली तर पुढे मात्र अवघड वाटतं. आज आपली पोरं शेती करायला तयार नाहीत. शिकून शहराकडे जाताहेत. राहिलेली गावातील काही पोरं चांगली आणि आधुनिक पद्धतीने शेती करतात. त्यांना बऱ्यापैकी शेती परवडते. काही पोरं तर शेतीला वैतागली आहेत. गावातील शेती करणाऱ्या अनेक पोरांना तर लग्नासाठी पोरीच मिळेनात. ३५-४० वर्षांचे झाले तरी बिनलग्नाचे आहेत अजून. त्यामुळे तर गावातल्या म्हणी आता बदलू लागल्या आहेत. पूर्वी म्हणायचे- चांगला शिक, मोठा हो, नोकरी कर नाही तर बारे द्यावे लागतील, शेण उचलायला लागेल! आताच्या म्हणी तर त्यापेक्षा गंभीर आहेत. चांगला शिक, नोकरी कर, मोठा हो, नाही शिकला तर शेती करावी लागेल आणि बिनलग्नाचा राहशील! अशा या विचित्र परिस्थितीमध्ये शेतीचं काय होईल संपा? शेतीच केली नाही, गावं ओस पडली तर शहरातील लोकांना कोण खायला घालेल दोन टायमाचं?''

यावर हसत संपत म्हणाला, ''हे बघ गंपा. कोणत्याही गोष्टीला एक वेळ येऊ द्यावी लागते. आपली शेती, शेतकरी एका विशिष्ट वळणावर पोहोचलेला आहे. प्रत्येक २०-३० वर्षांत पिढी बदलते. त्यावेळी एका वळणावर आपण आलेलो असतो. मागील ५० वर्षांपूर्वी उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी होती. नंतर हळूहळू नोकरी वर आली, शेती खाली गेली. ही प्रक्रिया १९७० ते २००० या काळापर्यंत झाली. मागील २० वर्षे शेती कनिष्ठ राहिलेली आहे. आता हळूहळू शेती परत 'उत्तम'कडे येईल. अर्थात यासाठी प्रयत्न करावे लागतील. शेतीला उत्तम करण्यासाठी संधी तर येणारच आहे. परंतु आलेल्या संधीचं सोनं केलं तर शेती उत्तम होऊ शकते. हे बघ गंपा, पीक उत्पादन घेण्यासाठी जमीन कमी होत आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, पूर,

वादळ, तापमान, थंडी या नैसर्गिक आपत्ती पर्यावरणातील बदलांमुळे वाढणार आहेत. यामुळे शेती उत्पादनावर अनिष्ट परिणाम होतील. म्हणजेच एकीकडे उत्पादनात घट तर दुसरीकडे लोकसंख्येत वाढ यामुळे शेती उत्पादनाला मागणी वाढणार आहे. अर्थात जो शेतकरी चांगल्या पद्धतीने शेती करेल, चांगल्या पद्धतीने विक्री व्यवस्थापन करेल त्याला पुढे चांगले दिवस आहेत. आता ढोरमेहनतीची शेती नकोय, बुद्धी वापरून शेती करावी लागेल. पूर्वीच्या काळी शेतकरी इरजिक पद्धतीने शेती करायचे. शेतातील अनेक मोठी कामे लगबगीत उरकण्यासाठी शेजारील शेतकऱ्यांबरोबर सावड किंवा पडजी करणे ही पद्धत होती. त्याचा परत अवलंब करावा लागेल. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालानुसार संघटन करून शेती उत्पादन आणि विक्री व्यवस्था यांचे व्यवस्थापन करावे लागेल. शेतीमाल विक्रीमध्ये कमीतकमी व्यापारी सहभाग ठेवून शेतकरी-ग्राहक यांच्यातील अंतर कमी केले तर व्यापाऱ्यांकडून होणारी मोठी लूट कमी करता येईल. शेतीला लागणाऱ्या निविष्ठांच्या खर्चात बचत करता येईल. शेतीला लागणाऱ्या निविष्ठांच्या खर्चात बचत करण्यासाठी अनेक उपाययोजना तसेच नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल. निसर्गाचा अभ्यास करून तसेच ग्राहकांच्या मागणीचा विचार करून उच्च तंत्रज्ञानावर आधारित शेती पद्धतीचा अवलंब करावा लागेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतीला प्रतिष्ठा मिळवून द्यावी लागेल. शेती करणाऱ्याला समाजामध्ये मानसन्मान मिळाला तर आजचा हुशार, बुद्धिमान तरुणही शेतातच रमेल. यासाठी शहरातील लोकांना खेड्यात- शेतीवर आणून त्यांना शेतीची माहिती द्यावी लागेल. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून खेड्यातील समाज, शेती आणि शहरी समाज यांचा त्रिकोण चांगला जोडला गेला पाहिजे. अर्थात या सर्व गोष्टींची हळूहळू सुरुवात झाली आहे. याला गती देण्याची मात्र गरज आहे. गंपा, मला तर खात्री आहे, पुढील १०-१५ वर्षांत शेती व्यवसाय हा पुन्हा 'उत्तम' होईल. अर्थात या मधल्या काळात सर्वांना फार मोठे काम करावे लागेल. शासनाला योग्य ते धोरण स्वीकारावे लागेल. ज्यातून शेती- शेतकरी टिकून त्यांना प्रोत्साहन मिळू शकेल. संशोधन- विस्तार करणाऱ्या यंत्रणांना अंग झटकून काम करावे लागेल. शहरातील समाजाला त्याच्या ताटात आलेल्या अन्नाच्या उत्पादकाबद्दल आदर वाटला पाहिजे. शेतकरी टिकला तर आपण टिकू असा विचार व्यापार करणाऱ्यांनी केला पाहिजे. महत्त्वाचे म्हणजे आपले हेही वाईट दिवस निघून जातील आणि 'सोन्याचे दिवस' पुन्हा येतील असा सकारात्मक विचार करून शेतकऱ्यांनी जोमाने काम करत राहिले पाहिजे.''

संपतच्या या बोलण्यावर गणपत फारच खूष झाला, त्याने संपतला मिठी मारली व म्हणाला, ''वा रं माझ्या पठ्ठ्या. खरंच तुझं भाषण ठेवलं तर अनेक लोकांच्या मनातील अंधार दूर होऊन ते शेती करायला लागतील. बाकीच्यांचे जाऊ दे, पण संपा- मी एक सांगतो तुला, शेतीकडे कायम सकारात्मक दृष्टीनं बघून उत्पादन घेतलं तर नक्कीच फायदा होतो. मी सुद्धा तू सांगितल्याप्रमाणे विचार करेल. चल आपण छान चहा घेऊ आणि लागू कामाला.''

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■

# लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**